**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार, दिनांक ०५ मे २०२४**

**ठळक बातम्या**

1. **लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातल्या प्रचाराचा आजचा शेवटचा दिवस.**
2. **भाजपनं आज वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिराती विरोधात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीची राज्याच्या अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडं तक्रार.**
3. **एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत वर्ध्यात दिनांक सात मे रोजी एकदिवसीय 'आंबा महोत्सवाचं' जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन.**

**आणि**

4. **राज्यात उष्णतेची लाट - उद्या पूर्व विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता.**

*****

तिसरा टप्पा प्रचारसभा

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातल्या प्रचाराचा आजचा शेवटचा दिवस असल्यामुळं राजकीय पक्षांकडून मतदारांपर्यंत पोचण्याची पराकाष्ठा करण्यात आली. या टप्प्यात राज्यातल्या रायगड, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर, हातकणंगले, सांगली, सोलापूर, बारामती, उस्मानाबाद, लातूर, माढा, आणि सातारा या ११ मतदारसंघात ७ मे रोजी मतदान होणार आहे. बारामती इथं आज पत्नी सुनेत्रासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी, तर कन्या सुप्रिया सुळे यांच्यासाठी राष्ट्रवादीचे शरद पवार यांनी जाहीर प्रचार सभा घेतल्या. काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार डॉक्टर शिवाजी काळगे यांच्या प्रचारार्थ लातूर शहरात जाहीर सभेचं

आयोजन करण्यात आलं. राज्यात इंडिया आघाडीचा प्रभाव असून, मराठवाड्यातल्या आठपैकी आठ जागांवर महाविकास आघाडीचेच उमेदवार निवडून येतील, असं काँग्रेस नेते अमित देशमुख यावेळी म्हणाले. कोल्हापूर इथं महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांच्या प्रचारार्थ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज रॅलीचं आयोजन करण्यात आलं आहे. युतीतील मित्रपक्षांचे नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येनं कोल्हापुरात दाखल झाले आहेत. तर पालघर मतदारसंघात भाजपचे उमेदवार डॉ. हेमंत सवरा यांनी आज सकाळी विरारच्या जीवदानी देवी मंदिरात दर्शन घेऊन प्रचाराला सुरुवात केली. यावेळी त्यांच्यासोबत सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण यांच्यासह महायुतीच्या सर्व घटक पक्षातले पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. सांगली लोकसभा मतदारसंघातील भाजप आणि महायुतीचे उमेदवार संजय पाटील यांच्या प्रचारार्थ मिरज इथं विकसित भारत@2047 संवाद मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. या संवादामध्ये  डॉक्टर, व्यापारी, उद्योजक सहभागी झाले होते. यांना भाजपचे ज्येष्ठ मंत्री  केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी मार्गदर्शन केलं. ‘देशात व्यापार, उद्योग, रोजगारांची निर्मिती करून,  समृद्धता आणि संपन्नता प्रस्थापित करून भारताला विश्वगुरू बनवायचं असेल, तर महायुतीचं सरकार आलं पाहिजे. त्यासाठी सर्वांनी महायुतीच्या उमेदवारांना भरपूर मताधिक्य द्यावं’, असं ते यावेळी म्हणाले. आज सोलापूर जिल्ह्यात माढा इथं उपमुख्यमंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते देवेन्द्र फडणवीस यांची जाहीर सभा झाली.

चौथा टप्पा

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात २९८ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असतील. या टप्प्यात नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड या मतदारसंघांमध्ये निवडणूक होणार आहे. या मतदारसंघांमध्ये एकंदर दोन कोटी २८ लाख मतदार त्यांचा कौल

देणार आहेत.  येत्या तेरा तारखेला मतदान होणार आहे. या टप्प्यातील प्रचाराला सुरुवात झाली आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा परवा  ७ मे रोजी दुपारी साडे चार वाजता अहमदनगर शहरातील सावेडी परिसरात  होणार आहे. .या मतदारसंघातील महायुती भाजपचे उमेदवार डॉ.सुजय विखे पाटील यांच्या प्रचारासाठी मोदी सभा घेणार आहेत.

पाचवा टप्पा

राज्यात ५ व्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची छाननी काल करण्यात आली. या टप्प्यात १३ लोकसभा जागांसाठी मतदान होत असून काल अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत ३९७ उमेदवारांचे एकूण ५१२ अर्ज आले होते. त्यापैकी ३०१ अर्ज वैध ठरल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगानं दिली आहे. या टप्प्यात मतदान येत्या २० मे रोजी होणार आहे.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळानं  आज राज्याच्या अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेऊन भारतीय जनता पक्षानं आज वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिराती विरोधात तक्रार केली आहे. यावेळी माध्यमांशी बोलताना लोंढे म्हणाले की पहिल्या दोन टप्प्यात झालेलं मतदान आपल्या विरोधात झालं आहे, याची जाणीव झाल्यानं  पंतप्रधान नरेंद्र मोदी आता धार्मिक अजेंडा आणि पाकिस्तानला निवडणूक प्रचारात घेऊन आले आहेत. आज एका आघाडीच्या दैनिकात पहिल्या पानावर ‘कुठं जल्लोष व्हायला पाहिजे - भारतात की  पाकिस्तानात हे पाहून मतदान करा’ अशी जाहिरात दिली गेली आहे.

भाजपसोबत त्यांचे सहकारी मित्र राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गट यांनी ही जाहिरात दिली आहे. आम्ही यापूर्वी देवेंद्र

फडणवीस, नितीन गडकरी, राम सातपुते, चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विरोधात तक्रार केली होती. पुरावे दिले होते. निवडणूक आयोगाला कारवाई करायला एवढा वेळ का लागतो, याबाबत देखील आम्ही विचारणा केली असल्याचं लोंढे म्हणाले. भाजप, अजित पवार गट आणि शिंदे गटाच्या उमेदवारांची उमेदवारी रद्द करावी, अशी मागणीही आज राज्याच्या निवडणूक अधिका-याकडं केली असल्याचं लोंढे यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री

लोकसभेची ही निवडणूक देशाचा विकास, देशभक्ती, देशाची प्रगती आणि देशाचा नेता निवडण्याची आहे. त्यामुळे आपण विचारपूर्वक आपलं भवितव्य आणि परिवाराचं भविष्य डोळ्यासमोर ठेऊन मतदान करावं, असा सल्ला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पहिल्यांदा मतदान करणाऱ्या युवकांना दिला. हातकणंगले मतदारसंघातील वाठार इथं आयोजित करण्यात आलेल्या युवा संवाद मेळाव्यात मुख्यमंत्री बोलत होते. आपलं एक मत देश घडविणारं असतं, देशाचा विकास करणारं आणि देशाचा नेता घडविणारं असतं. लोकशाहीत प्रत्येक मताला किंमत असते आणि विद्यार्थी हे देशाचे भवितव्य असल्याचंही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

प्रवेश परीक्षा-नीट

वैद्यकीय अभ्यासक्रमासाठीची प्रवेश परीक्षा नीट आज पार पडली. देशभरातल्या ५५७ आणि देशाबाहेरील १४ अशा ५७१ केंद्रांवर दुपारी दोन ते सायंकाळी सुमारे सव्वा पाच या दरम्यान ही परीक्षा घेण्यात आली. सुमारे २४ लाखाहून अधिक परीक्षार्थींनी ही परीक्षा दिली आहे.

‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण पुणे आणि शिरुर लोकसभा मतदारसंघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी

मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाजमाध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

आंबा महोत्सव-वर्धा

वर्धा जिल्ह्यात आंबा या पिकाची फळबाग लागवड मोठ्या प्रमाणावर होत असून उत्पादित आंब्याला बाजारपेठ उपलब्ध व्हावी, फळ पिकांचं निर्यातक्षम उत्पादन, विक्री व्यवस्थापन व्हावं आणि या माध्यमातून शेतकऱ्यांना शाश्वत उपजीविकेचं साधन उपलब्ध करून देता येईल, या उद्देशानं परवा ७ मे रोजी सकाळी ११ वाजता एकदिवसीय आंबा महोत्सवाचं आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात करण्यात आलं आहे. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली आंबा महोत्सव आयोजित करण्यात येत असून कृषी विद्यापीठाचे शास्त्रज्ञ डॉ.भगवान कापसे, महाकेसर आंबा बागायतदार संघाचे कोषाध्यक्ष बाळासाहेब उगले यांचं मार्गदर्शन या महोत्सवात लाभणार आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या आंबा महोत्सवात उपस्थित राहण्याचं आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केलं आहे.

अपघात

बुलढाणा जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर आज पहाटे झालेल्या एका कार अपघातात २ जणांचा मृत्यू झाला असून २ जण जखमी झाले आहेत. जखमींना छत्रपती संभाजीनगरच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. एका अज्ञात वाहनानं पाठीमागून टक्कर दिल्यानं हा अपघात झाला. नांदेड जिल्ह्यात लग्नाचं वऱ्हाड घेऊन जात असलेला टेम्पो उलटल्यानं झालेल्या अपघातात १५ वऱ्हाडी जखमी झाले आहेत. यात चौघांची प्रकृती गंभीर आहे. जखमींना नायगाव इथल्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

बुद्‌ध जयंती

डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती आणि बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर बुद्‌धिस्ट सेमिनरी उंटखाना यांच्या संयुक्त विद्‌यमानं 2 हजार 568 व्या बुद्‌ध जयंती निमित्त तीन दिवसीय बुद्‌ध महोत्सव दिनांक 23 ते 25 मे दरम्यान दीक्षाभूमीवर आयोजित करण्यात आला आहे. गुरुवार दिनांक 23 मे रोजी सायंकाळी 6 वाजता शंभर बालकांना श्रामणेर दीक्षा दिली जाईल, अशी माहिती स्मारक समितीचे अध्यक्ष तथा धम्मसेनानायक भदन्त आर्य नागार्जुन सुरेई ससाई यांनी काल प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

क्षयरोग तपासणी

गोंदिया जिल्ह्यात आठही तालुक्यातील चौदा खाजगी रुग्णालयात शासनामार्फत क्षयरोग तपासणीसाठी निशुल्क छातीचा एक्स-रे काढण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मागील वर्षी तब्बल १६ हजार २७० संशयित रुग्णांनी शासनाच्या निशुल्क एक्स-रे योजनेचा लाभ घेतला. दोन आठवड्‌यापेक्षा जास्त खोकला, दोन आठवड्‌याहून अधिक कालावधीचा ताप आणि वजनात घट, खोकल्यातून रक्त पडणं अशी लक्षणं असलेल्या संशयित लोकांनी आरोग्य संस्था किंवा आशा सेविकामार्फत आपल्या जवळच्या शासनसंलग्न खाजगी रुग्णालयात जाऊन छातीचा एक्स-रे काढून शासनाच्या योजनेचा फायदा घ्यावा, असं आवाहन गोंदिया जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार यांनी केलं आहे.

निधन

अभिनेते, लेखक आणि दिग्दर्शक क्षितीज झारापकर यांचं आज वयाच्या ५४ व्या वर्षी मुंबई इथं निधन झालं. अनेक दिवसांपासून ते रुग्णालयात उपचार घेत होते. झारापकर यांनी गोळाबेरीज, ठेंगा, एकुलती एक, आयडियाची कल्पना आदी चित्रपटांतून भूमिका केल्या होत्या. त्यांनी विविध चित्रपट आणि नाटकांचं दिग्दर्शन आणि लेखनही केलं होतं.

हवामान

विदर्भात सध्या उष्णतेची लाट आलेली असून हवामान कोरडं आहे. येत्या ३ दिवसात कमाल तापमान २ ते ३ अंशांनी वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली असून, गेल्या २४ तासांत विदर्भात कमाल तापमान ४०.४ ते ४४.३ दशांश अंश सेल्सिअसच्या दरम्यान  होतं. अकोला इथं विदर्भातील सर्वाधिक तापमान ४४.३ दशांश अंश सेल्सियस इतकं नोंदवलं गेलं.  त्या खालोखाल अमरावती आणि चंद्रपूर इथं ४३. ८ दशांश अंश, तर वाशिम, वर्धा आणि गडचिरोलीत ४३ अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदविण्यात आलं. उद्या विदर्भातील अकोला इथं उष्णतेची लाट कायम राहण्याची तर अकोला, यवतमाळ, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यांत पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्यानं व्यक्त केली आहे. परवा पूर्व विदर्भात विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे. दरम्यान, वाढत्या तापमानामुळं नांदेड शहरात चारचाकी वाहनानं पेट घेतल्याची घटना घडली आहे. नांदेडमध्ये काल ४३.२ दशांश अंश सेल्सिअस तापमानाची उच्चांकी नोंद झाली होती. आज तापमानाचा पारा वाढलेलाच आहे. अमरावती शहरातील तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत असून नागरिकांना उष्माघात झाल्यास जिल्हा रुग्णालय प्रशासन सज्ज झालं आहे.  नागरिकांनी जास्त तापमानात बाहेर पडू नये आणि भरपूर पाणी प्यावं. आवश्यक काम पडल्यास संपूर्ण डोक्याला कॉटन दुपट्टा बांधून घराच्या बाहेर पडावं, असं आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक यांनी केलं आहे.

*****